सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)

रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई ४००६१४

Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022-27576324

जाक्र/एबाविसेयोआ/मुसे-मविप/स.से.भरती/2024-25/05/ 565 / नवी-मुंबई दिनांक: ~~03~~ फेब्रूवारी 2025

04 FEB 2025

## प्रसिध्दीपत्रक

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या विभागाच्या अधिनस्त १०४ नागरी प्रकल्प कार्यालयातील गट- संवर्गातील मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) वेतन श्रेणी S-१३ (३५४००-११२४००) सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन **दि.१४-१०-२०२४ ते दि.०३-११-२०२४** ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.

भूतपुर्व दुय्यम सेवा मंडळाच्या कक्षेतील गट- संवर्गातील मुख्यसेविका (नागरी प्रकल्प) वेतन श्रेणी S-१३ (३५४००-११२४००) सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन सदर संवर्गाची सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने कॉम्पुटरबेस वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा **दि.१४-२-२०२५, दि.२२-२-२०२५** ते **दि.२३-२-२०२५, दि.२६-२-२०२५ ते दि.२७- २-२०२५** व **दि. ०२.०३.२०२५** रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजना व टी.सी.एस कंपनीमार्फत विविध परीक्षा केंद्रावर वेगवेगळया शिफ्टमध्ये आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर ऑनलाईन परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक खालील प्रमाणे आहे

**Integrated Child Development Service Scheme (ICDS) Exam Schedule**

| Sr.No. | Exam Date | Day | Duration | Exam Time | Shift | Post Name |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 14/Feb/2025 | Friday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |
| 2 | 22/Feb/2025 | Saturday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |
| 3 | 22/Feb/2025 | Saturday | 90 Min | 12:30 PM To 02:00 PM | Shift 2 | Supervisor |
| 4 | 22/Feb/2025 | Saturday | 90 Min | 04:00 PM To 05:30 PM | Shift 3 | Supervisor |
| 5 | 23/Feb/2025 | Sunday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |
| 6 | 23/Feb/2025 | Sunday | 90 Min | 12:30 PM To 02:00 PM | Shift 2 | Supervisor |
| 7 | 23/Feb/2025 | Sunday | 90 Min | 04:00 PM To 05:30 PM | Shift 3 | Supervisor |
| 8 | 26/Feb/2025 | Wednesday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |
| 9 | 26/Feb/2025 | Wednesday | 90 Min | 12:30 PM To 02:00 PM | Shift 2 | Supervisor |
| 10 | 26/Feb/2025 | Wednesday | 90 Min | 04:00 PM To 05:30 PM | Shift 3 | Supervisor |
| 11 | 27/Feb/2025 | Thursday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |
| 12 | 27/Feb/2025 | Thursday | 90 Min | 12:30 PM To 02:00 PM | Shift 2 | Supervisor |
| 13 | 27/Feb/2025 | Thursday | 90 Min | 04:00 PM To 05:30 PM | Shift 3 | Supervisor |
| 14 | 02/Mar/2025 | Sunday | 90 Min | 09:00 AM To 10:30 AM | Shift 1 | Supervisor |

२.उमेदवारांना **दि.०७-०२-२०२५ पासून प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने** https://www.icds.gov.in या संकेतस्थळावर **उपलब्ध करून देण्यात येणार असुन सदर प्रवेशपत्रामध्ये परीक्षेचे वेळ व तारीख, परीक्षा केंद्र,सूचना व इतर महत्वाच्या आवश्यक माहितीचा समावेश आहे.** उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमुद सर्व सुचनांची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

३.**दिव्यांग उमेदवार** -लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना https://www.icds.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.सदर मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रांसह दिव्यांग उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

४.ऑनलाईन अर्जांची संख्या, परीक्षा केंद्राची क्षमता व संबधित उमेदवारांनी परीक्षा केंद्राकरीता सादर केलेले विकल्प विचारात घेवून संबधित उमेदवारांचे परीक्षा केंद्र निश्चित केलेले आहे. त्यामुळे **परीक्षेची वेळ, दिनांक व परीक्षा केंद्र बदलण्या संदर्भातील कोणतेही निवेदने विचारात घेण्यात येणार नाही याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५.**ऑनलाईन परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रश्नसंच चार गटांमध्ये विभागण्यात येणार आहे. उमेदवारांनी प्रत्येक** गटातील प्रश्न ठराविक वेळेतच सोडविणे अनिवार्य राहील. ठराविक वेळेनंतर पुढील गटातील प्रश्नसंच सोडविण्यासाठी उपलब्ध होणार आहेत. उमेदवारांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करण्यासाठी MOCK TEST LINK सदर भरती प्रक्रियेच्या https://www.icds.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.सदर सुविधेचा लाभ घेण्याबाबत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे.**

१. उमेदवारांना प्रश्नसंच किंवा उत्तरतालिका या संदर्भात आक्षेप/निवेदन सादर करावायचे असल्यास त्याबाबत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या संदर्भातील वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येत आहे. **प्रश्नसंच किंवा उत्तरतालिका या संदर्भात आक्षेप केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार आहेत इतर कोणत्याही पध्दतीने सादर केलेले (पत्राव्दारे,ईमेल,मेसेजेस) आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

२. परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राचे प्रश्नसंच स्वतंत्र असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. विविध सत्रातील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची काठिण्य पातळी तपासण्यांत येऊन त्याचे सामान्यीकरण/समतूल्य करण्याबाबत (Normalization)संबधीत कंपनीकडून देण्यांत आलेले सूत्र या प्रसिध्दीपत्रकासह जोडण्यात आलेले आहे.सदर (Normalization) गुणांकन पध्दत सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

३. सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमदेवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत **गैरमार्गाने नोकरी देण्याचे/परीक्षा पास करुन देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास अशा भूलथापांना बळी न पडता त्याबाबत नजीकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क करावा.**

४.भरती प्रक्रियेशी संबधीत अधिकृत माहितीकरीता महिला व बाल विकास विभागाच्या https://www.icds.gov.in संकेतस्थळाला वेळोवेळी भेट दयावी. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी व ईमेल वेळोवेळी पाठविण्यात येणा-या सूचनांचे उमेदवारांनी पालन करावे.

५.सदर भरती प्रक्रियेशी संबधीत हॉल टिकीट ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून घेताना **तांत्रिक अडचणी आल्यास संबधीत उमेदवारांनी ९५१३२६५५८६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.**

दिनांक :-०४/०२/२०२५
स्थळ :- नवी मुंबई

कैलास पगारे (भा.प्र.से.)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई.